MAHARASHTRA TOURISM

# महाराष्ट्र
# एक अनोखं जग

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन

मार्च २०२६ / अंक ३


पेंच


कोलाड


पाचगणी

## महाराष्ट्रातील विशेष उपक्रमांचा आढावा

मार्च 2026 दरम्यान महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राने आपला मजबूत वेग कायम ठेवला. अनुकूल हवामान, गुढीपाडवा यांसारख्या सणांचा उत्साह आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमुळे पर्यटनाला मोठी चालना मिळाली. राज्यातील पर्यटनस्थळांवर उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले, ज्यातून पर्यटकांचा वाढता सहभाग आणि एकूणच पर्यटन आकर्षणात सातत्यपूर्ण वाढ अधोरेखित झाली.

## मुंबई आणि नाशिकमध्ये घुमला संस्कृतीचा आवाज; पर्यटन विभागातर्फे दिमाखदार गुढीपाडवा शोभायात्रेचे आयोजन



हिंदू नववर्षाचे स्वागत करण्यासाठी आणि महाराष्ट्राचा समृद्ध सांस्कृतिक वारसा पर्यटकांसमोर उलगडण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या वतीने 19 मार्च रोजी मुंबई आणि नाशिक येथे भव्य ‘सांस्कृतिक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. "संस्कृतीची गुढी, पर्यटनाची नवी भरारी" ही या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना असून, याद्वारे पर्यटनातून संस्कृतीचा जल्लोष साजरा करण्यात आला. मा. पर्यटन मंत्री शंभुराज देसाई आणि मा. पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या संकल्पनेतून राज्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच या उपक्रमाअंतर्गत पर्यटकांना, तरूण पिढीला समृद्ध वारसा, पारंपरिक लोककला व पोशाखाची नव्याने ओळख करून देण्यात आली.

## जागतिक स्तरावरील पर्यटन बाजारपेठेत महाराष्ट्राची ओळख अधिक दृढ करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विभागाकडून जर्मन प्रतिनिधीमंडळासाठी विशेष परिचय सहल

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागामार्फत जर्मनीतील प्रतिनिधीमंडळासाठी विशेष परिचय सहल यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. युरोपीय पर्यटन बाजारपेठेत महाराष्ट्राच्या पर्यटनाचे स्थान अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने 12 ते 16 मार्च 2026 या कालावधीत ही सहल आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमाद्वारे जर्मन माध्यम प्रतिनिधी, टूर ऑपरेटर, कंटेंट क्रिएटर तसेच पर्यटन क्षेत्रातील महत्त्वाचे भागधारक यांना महाराष्ट्रातील पर्यटन संपदेचा समृद्ध आणि प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली. या अनुभवामध्ये युनेस्को जागतिक वारसा स्थळ, समृद्ध सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक स्मारके तसेच पवित्र तीर्थक्षेत्रांचा समावेश होता.

या जर्मन परिचय सहलीत पर्यटन विभागाच्या छत्रपती संभाजीनगर विभागाचे उपसंचालक श्री. विजय जाधव तसेच विभागातील इतर अधिकारी उपस्थित होते. माध्यम प्रतिनिधी, टूर ऑपरेटर, कंटेंट क्रिएटर आणि पर्यटन क्षेत्रातील प्रमुख भागधारक अशा एकूण 11 जणांनी या जर्मन परिचय सहल 2026 मध्ये सहभाग नोंदविला.



# जेन ओ - पिक्सेल्स अँड प्ले 2026 मुळे मुंबई जागतिक गेमिंग आणि युवा नवोन्मेषाच्या नकाशावर




मुंबईत ‘जेन ओ - पिक्सेल्स अँड प्ले 2026’ या चार दिवसीय आंतरराष्ट्रीय महोत्सवाच्या माध्यमातून सर्जनशीलता आणि तंत्रज्ञानाचा उत्साही संगम पाहायला मिळाला. वाद्रें येथील एमएमआरडीए मैदान येथे आयोजित या महोत्सवात 23 हून अधिक देशांतील निर्माते, गेमर्स आणि नवोन्मेषक सहभागी झाले होते.

या महोत्सवाला माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित राहून महाराष्ट्रातील अग्रगण्य निर्मात्यांसोबत चर्चा सत्रात सहभाग घेतला. तसेच समारोप सोहळ्यात महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते ‘ऑरेंज अवॉर्ड्स’ अंतर्गत नामांकित निर्मात्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाचे प्रधान सचिव श्री. संजय खंदारे तसेच पर्यटन संचालनालयाचे सहसंचालक श्री.संतोष जाधव, कार्यकारी अभियंता श्री.आकाश चकोर, मुख्य लेखा अधिकारी श्री. विठ्ठल सुडे आणि श्री. रमेश कदम, अधिकारी, पर्यटन संचालनालय हे देखील उपस्थित होते.

या महोत्सवात अभंग रिपोस्ट, त्रिलोक बँड,‘देवा चांगभल रं’ आणि ‘द फोक आख्यान’ या कार्यक्रमांना प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

# आगामी कार्यक्रम

## सह्याद्रीच्या कुशीत पर्यटनाचा उत्सव





पाटण, जि. सातारा येथे दि. 2 ते 6 एप्रिल 2026 दरम्यान ‘कोयना दौलत डोंगरी महोत्सव 2026’चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचा पर्यटन विभाग, जिल्हा प्रशासन सातारा आणि विभागीय पर्यटन संचालनालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव होणार असून, साताऱ्यातील निसर्गरम्य स्थळांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर स्थान मिळवून देणे हा मुख्य उद्देश आहे. यामुळे स्थानिक पर्यटनाला चालना मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

महोत्सवात शाहिरी पोवाडा, भजनी मंडळ, ब्रास बँड आणि लावणी महोत्सव यांसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच बोटींग, घोडेस्वारी, पॅराग्लायडिंग, उंट सफारी, आनंदमेळा, खाद्यजत्रा, कृषी व पशुपक्षी प्रदर्शन अशी विविध आकर्षणे पर्यटकांसाठी उपलब्ध असणार आहेत. मनोरंजन क्षेत्रातील अनेक नामवंत कलाकारांची उपस्थितीही महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

# महत्त्वाच्या बातम्या

## पर्यटन संचालनालयातर्फे सात दिवसीय 'टूरिस्ट गाइड ट्रेनिंग'

पर्यटन संचालनालयातर्फे 'नमो पर्यटन कौशल्य प्रशिक्षण योजना' अंतर्गत पुणे प्रादेशिक विभागातील इच्छुक युवक-युवतींसाठी सातदिवसीय 'टूरिस्ट गाइड ट्रेनिंग' आयोजित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात पर्यटनस्थळांवर मार्गदर्शन, आतिथ्य सेवा तसेच पर्यटनाशी संबंधित विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.




पुणे प्रादेशिक विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर या जिल्ह्यांतील कोणत्याही शाखेतील पदवीधर आणि 18 ते 45 वयोगटातील सुमारे 200 युवक-युवतींना या प्रशिक्षणाची संधी देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये ग्वाल्हेर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट तसेच महाराष्ट्र पर्यटन संचालनालयातील तज्ज्ञ प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना पर्यटन संचालनालयाकडून प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच सिंहस्थ कालावधीत टूर गाइड म्हणून काम करण्यासाठी ओळखपत्रही प्रदान करण्यात येणार आहे.

## ऐतिहासिक 'काळा घोडा' परिसर सुशोभीकरणाने पर्यटनाला चालना

‘काळा घोडा' हा परिसर लवकरच नागरिकांसाठी खुला होणार असून दक्षिण मुंबईतील ऐतिहासिक पर्यटनाला नवी चालना मिळणार आहे. सुशोभीकरण प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचला असून मार्च महिन्यात उद्घाटनाचे नियोजन आहे. परिसरातील दगडी फरसबंदी असलेले पादचारी मार्गासह नागरी कामे पूर्ण झाली असून सांस्कृतिक आकर्षण वाढवण्यासाठी रंगीत भित्तीचित्रे आणि कलात्मक स्थापत्य (स्ट्रीट आर्किटेक्चर्स) बसवण्यात आले आहेत.

या प्रकल्पात लवकरच ‘अल फ्रेस्को' डायनिंगची सुविधाही सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे पर्यटकांना खुल्या वातावरणात जेवणाचा अनुभव घेता येणार आहे. देशी, विदेशी पर्यटकांना येथील खाद्य संस्कृतीचा आस्वाद घेता येणार असून पर्यटन व्यवसायाला गती मिळणार आहे असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.



## राज्यातील 12 गडांसाठी केंद्राची विशेष योजना

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या राज्यातील 12 ऐतिहासिक गडांच्या संरक्षण, संवर्धन आणि पर्यटन विकासासाठी केंद्र सरकारने तीन टप्प्यांचा सर्वसमावेशक 'साइट मॅनेजमेंट प्लॅन' तयार केला आहे.

या 12 गडांचे जतन, पुनर्संचयितीकरण, पर्यटन सुविधा विकसित करणे आणि स्थानिक रोजगारनिर्मिती करणे यासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यात 6 महिने ते दोन वर्षांचा अल्पकालीन टप्पा, 2 ते 5 वर्षांचा मध्यम कालावधीचा टप्पा आणि 5 ते 10 वर्षांचा दीर्घकालीन टप्पा असे तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहेत.

या तीन टप्प्यांत प्रशासकीय संरचना मजबूत करणे, गडांवरील मूलभूत पायाभूत सुविधा उभारणे, पर्यटक मार्गदर्शन व माहिती प्रणाली विकसित करणे, पर्यटन सुविधा वाढविणे, उत्खनन व संवर्धनाची कामे करणे, आपत्ती व जोखीम व्यवस्थापन तसेच किल्ल्यांचे दीर्घकालीन संवर्धन, परिसर व पर्यावरण व्यवस्थापन अशी विविध कामे केली जाणार आहेत.




## भिवंडीच्या छत्रपती शिवाजी महाराज मंदिराला 'ब' वर्ग पर्यटन दर्जा

महाराष्ट्रातील पहिले छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर म्हणून गौरविलेल्या गेलेल्या भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शक्तीपीठास महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाने आता 'ब' वर्गाचे पर्यटन व तीर्थक्षेत्र दर्जा प्रदान केला आहे. याआधी या मंदिराला 'क' वर्ग पर्यटन दर्जा देण्यात आला होता.



याआधी या छत्रपती शिवाजी महाराज मंदिराला 'ब' वर्गाचा दर्जा देण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्य निकष समितीच्या 28 फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावाची छाननी करण्यात आली होती.
त्यामध्ये शासन निर्णयातील निकषांनुसार प्रस्ताव परिपूर्ण असल्याचे आढळून आले होते. त्यानंतर आता राज्यपाल यांच्या आदेशानुसार हा दर्जा देण्यात आला आहे.

## राधानगरी बॅकवॉटर परिसर 'प्रति' समुद्र किनाऱ्याचा नजराणा



राधानगरी, दाजीपूर परिसरातील निसर्गातील हिरवीगार गर्द देवराई, राधानगरी जलाशयाचे बॅक वॉटरमुळे निर्माण झालेल्या प्रति 'बीच' चा नजराणा अनुभवायचा असेल तर सह्याद्रीच्या रांगेतील हसणे परिसराला भेट देऊन उन्हाळी पर्यटनाचा अनुभव कुटुंब आणि मित्र परिवार सहलीमार्फत करण्यासारखा आहे. राधानगरी आणि दाजीपूर परिसराला आवर्जून भेट पर्यटन प्रेमींनी दिली पाहिजे. राधानगरी परिसरात निसर्गाच्या सानिध्यात असलेली पर्यटन स्थळे, राधानगरी जलाशय, राधानगरी बॅक वॉटर परिसर आणि फुलपाखरू उद्यान पर्यटकास मनमोहकपणे योग आणत आहेत. राधानगरी तालुक्यातील राधानगरी, दाजीपूर आणि काळम्मावाडी परिसर निसर्ग सौंदर्याने नटलेला परिसर आहे.
या सौंदर्यात आणखी भर घालणारी बाब म्हणजे राधानगरी जलाशयाचे बॅक वॉटर, विस्तीर्ण क्षेत्र लाभलेला लक्ष्मी जलाशय या परिसरात समुद्राचे प्रतिरूप दर्शवतो. कोकणाला जोडणाऱ्या कोल्हापूर-राधानगरी-फोंडा या राज्यमार्गावर हसणे गावापासून दाजीपूरपर्यंत 5 किलोमीटर अंतरावर राधानगरी जलाशयाचे बॅक वॉटर मनमोहित करून टाकते.
या परिसरात 10 देवराई निसर्गाचा वारसा जपत आहेत. हसणे गावच्या लघु तलाव शेजारी गंगोबाची देवराई, दाजीपूर येथे उगवाई देवी देवराई, तर शेजारच्या भागात फराळे येथील डोंगराई देवराई, वाकी येथील वाकी देवराई, सावरदे, पडसाळी, पाट पन्हाळा, मिसळवाडी याठिकाणी देवराई सुस्थितीत असून दुर्मिळ वनस्पती आणि प्राण्यांचे आगार पाहण्यास मिळते.

# उन्हाळ्यात अनुभवा गारवा...

## पेंच

महाराष्ट्राच्या पूर्वेकडील भागात वसलेले पेंच हे सागवानाच्या दाट जंगलांसाठी आणि समृद्ध वन्यजीवांसाठी प्रसिद्ध आहे. येथे मिळणारा अनुभव केवळ पारंपरिक वन्यजीव पर्यटनापुरता मर्यादित नसून, तो अधिक सखोल आणि अनुभव समृद्ध आहे. सकाळची सुरुवात पक्ष्यांच्या किलबिलाटाने होते आणि वाघाचे दर्शन होण्याची रोमांचक शक्यता प्रत्येक क्षणाला उत्सुकतेने भरून टाकते. पेंच परिसरात निसर्गाचे सौंदर्य सर्वांना मोहुन टाकणारं आहे.



## कोलाड



कोलाड हे महाराष्ट्रातील एक लोकप्रिय साहसी पर्यटन स्थळ म्हणून हळूहळू उदयास आले आहे. मात्र, या ठिकाणी जुन्या काळाचा एक वेगळाच मोहकपणा आजही जाणवतो. कोलाडमधील कुंडलिका नदीवरील व्हाइट वॉटर राफ्टिंगसाठी हे ठिकाण विशेष ओळखले जाते. व्यस्त जीवनातून थोडा विरंगुळा मिळवण्यासाठी पर्यटक येथे येतात. हिरवाईने नटलेले परिसर आणि नदीकाठावरील निवास व्यवस्था यामुळे कोलाडचा अनुभव अधिक समृद्ध होतो. धुक्याने भरलेल्या सकाळ आणि संध्याकाळी शेकोटीभोवती आठवणी रंगवणे, हा अनुभव येथे अविस्मरणीय ठरतो.

## पाचगणी

सह्याद्रीच्या कुशीत शांतपणे विसावलेले पाचगणी हे जुन्या काळाचा अद्वितीय मोहकपणा जपणारे उंच हवेचे ठिकाण  आहे. स्ट्रॉबेरीची शेती, आकर्षक कॉटेजेस आणि दऱ्याखोऱ्यांचे मोहक दृश्य यामुळे येथे शांत आणि प्रसन्न वातावरण निर्माण होते, जे शहरातील गोंगाटापासून दूर नेते. टेबल लँड हे विस्तीर्ण पठार या भागातील काही अत्यंत सुंदर सूर्यास्त अनुभवण्याची संधी देते. पाचगणी तुम्हाला थांबायला, मोकळा श्वास घ्यायला आणि जीवनातील साध्या गोष्टींचा आनंद घ्यायला आमंत्रित करते.



## मालवण



मालवण हे निसर्ग आणि संस्कृती यांचे सुंदर संगम असलेले ठिकाण आहे. येथे स्वच्छ, नितळ समुद्रकिनारे, ऐतिहासिक किल्ले आणि पारंपरिक मालवणी खाद्यसंस्कृती यांचा समृद्ध वारसा अनुभवता येतो. मराठ्यांच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारा सिंधुदुर्ग किल्ला येथे आहे. येथील शांत आणि स्वच्छ पाणी पर्यटकांना स्नॉर्केलिंग आणि स्कुबा डायव्हिंगसारख्या जलक्रीडांचा अनुभव येथे घेता येतो. मालवणमध्ये जीवन समुद्राच्या लाटांच्या तालावर वाहत असते, आणि येथे घालवलेला प्रत्येक क्षण समाधानाची अनुभूती देणारा ठरतो.

MAHARASHTRA TOURISM

MAHARASHTRA

www.maharashtratourism.gov.in | www.mahaatithi.org

**Follow us on:**

MaharashtraTourism    diot@maharashtratourism.gov.in    @maha_tourism

maharashtratourismofficial